■ वर्ष- १० ■ अंक- ३८ ■ मुंबई, मंगळवार, ०६ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०२४ ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 हल्लेप्रकरणात तिघांना अटक, सरपंचासह 5 फरार

3 → स्पर्धा परीक्षांची दुकानं

'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुणे दौऱ्यावर; पूर परिस्थितीचा घेणार आढावा

**पुणे:**

पुणे शहरातील सातत्याच्या पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज (5 ऑगस्ट) पुणे दौऱ्यावर येत आहेत. पुण्यातील आपत्ती व्यवस्थापन आणि मदत कायाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून ते शहरातील पूर परिस्थितीचा आढावा घेतील, अशी माहिती आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. पुणे जिल्हातील घाटमाथ्यांवर झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणे तुडूंब भरली आहेत. आजही पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यातच खडकवासला धरणातील पाणी 65 टक्के कमी करण्याचा निर्णय पाटबंधारे विभागाने घेतला आहे. तर पुण्यातील पूरपरिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुण्यात लष्कराच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय पीएमसी, फायर ब्रिगेड, एसडीआरएफ या टीमही तैनात करण्यात आल्याची माहिती आहे. दुसरीकडे, भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुणे, सातारा आणि पालघर जिल्ह्यांसाठी 4 ऑगस्टसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. याशिवाय नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांनाही ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. गोदावरी नदीने सुरक्षेची पातळी ओलांडल्याने पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. गोदावरी नदीच्या नदीकिनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून खबरदारी घेण्याचेही आवाहन केले आहे. पुणे आणि नाशिकसह महाराष्ट्रातील अनेक भागात पूरस्थिती कायम आहे. नाशिकच्या मालेगावमध्ये गिरणा नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने 12 जण अडकून पडले आहेत. एनडीआरएफ आणि अग्निशमन विभागाच्या आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी आहेत आणि अडकलेल्या लोकांना वाचवण्याची तयारी करत आहेत. नाशिकमध्ये गेल्या 48 तासांत 250 मिमी पाऊस झाला आहे. गंगापूर धरण 86 टक्के भरल्याने काल रात्री धरण सोडावे लागले. गोदावरीच्या पाण्याची पातळी वाढल्याने २९ वर्षीय तरुण बेपत्ता आहे. नदीकाठावरील अनेक दुकाने रिकामी करण्यात आली असून स्थानिक प्रशासनाने रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुण्यातील एकता नगरसारख्या भागात पूर आला असून अनेक घरे रिकामी करण्यात आली आहेत. बाधित भागात बचाव कार्यात मदतीसाठी लष्करालाही पाचारण करण्यात



आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पुण्यातील जलयुक्त भागाला भेट देणार आहेत. ते सिंहगड रोड परिसराची पाहणी करून रहिवाशांशी बोलणार आहेत. 12 लोक अडकले आहेत. एनडीआरएफ आणि अग्निशमन विभागाच्या आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी आहेत आणि अडकलेल्या लोकांना वाचवण्याची तयारी करत आहेत. नाशिकमध्ये गेल्या 48 तासांत 250 मिमी पाऊस झाला आहे. गंगापूर धरण 86 टक्के भरल्याने काल रात्री धरण सोडावे लागले. गोदावरीच्या पाण्याची पातळी वाढल्याने २९ वर्षीय तरुण बेपत्ता आहे. नदीकाठावरील अनेक दुकाने रिकामी करण्यात आली असून स्थानिक प्रशासनाने रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुण्यातील एकता नगरसारख्या भागात पूर आला असून अनेक घरे रिकामी करण्यात आली आहेत. बाधित भागात बचाव कार्यात मदतीसाठी लष्करालाही पाचारण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पुण्यातील जलयुक्त भागाला भेट देणार आहेत. सिहगड रोड परिसराची ते पाहणी करणार असून मुसळधार पावसानंतर महाराष्ट्रातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

## बदलापूरमध्ये एमआयडीसी कंपनीत रिएक्टरचा भीषण स्फोट; एका कुटुंबातील तिघे जखमी

**बदलापूर**

बदलापूरमध्ये आज पहाटे एक भीषण घटना घडली आहे. बदलापूरच्या खरवई एमआयडीसी परिसरातील रेअर फार्मा कंपनीत पहाटे साडेतीन ते चार वाजताच्या दरम्यान एक भीषण स्फोट झाल्याचं समोर आलं आहे. बदलापूरकरांची श्रावण महिन्यातील पहिली सकाळ एका मोठ्या स्फोटाने झाली आहे. या घटनेत एमआयडीसी परिसरात राहणरे घनश्याम मेस्त्री यांच्या कुटुंबातील 3 जण जखमी झाले आहेत. तर या भीषण घटनेत घनश्याम मेस्त्री यांचा पाय निकामी झाला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. परिसरातील सर्वच जण गाढ झोपेत असताना पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण एमआयडीसी परिसर हादरलं आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बदलापूर शहरातील खरवई एमआयडीसी परिसरातील रेअर फार्मा कंपनीत आज पहाटे साडेतीन ते चार वाजताच्या सुमारास रिएक्टर आणि रिसिव्हरचा एक भीषण स्फोट झाला. या स्फोटामुळे कंपनीत मोठी आग लागली होती. हा स्फोट इतका भीषण होता की, परिसरातील सर्व घरांना हादरे बसले. रिएक्टर आणि रिसिव्हर फुटल्याने एमआयडीसी परिसरातील अनेक घरांवर रिएक्टर आणि रिसिव्हरचे काही भाग





पडले. सर्वच जण गाढ झोपेत असताना पहाटेच्या सुमारास हा स्फोट झाला त्यामुळे नागरिकांना स्वतःला वाचवण्याची संधी मिळाली नाही. एमआयडीसी परिसरात राहणरे घनश्याम मेस्त्री यांच्या घरावर देखील रिएक्टर आणि रिसिव्हरचे काही भाग पडले. या घटनेत घनश्याम मेस्त्री यांच्या कुटूंबातील 3 जण जखमी झाले आहेत, तर त्यांच्या घराचं देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या भीषण घटनेत घनश्याम मेस्त्री यांचा पाय निकामी झाला आहे. तर त्यांच्या लहान मुलीच्या पायाला देखील दुखापत झाली आहे. जखमींना उपचारसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या भीषण स्फोटामुळे संपूर्ण एमआयडीसी परिसर हादरला होता. नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. परिसरातील इतर घरांमध्ये देखील रिएक्टरचे काही भाग पडले होते.

या भीषण घटनेबाबत स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी 4 वाजता मोठा स्फोट झाला. या स्फोटाचा आवाज अत्यंत भीषण होता. या घटनेत घनश्याम मेस्त्री यांच्या घरावर रिएक्टर आणि रिसिव्हरचे काही भाग पडले आणि त्यांच्या घरातील 3 जण जखमी झाले. हा स्फोट अत्यंत भीषण होता. या घटनेची माहिती मिळताच कुळगाव बदलापूर अग्निशमन दलाचे अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनतीनंतर आगीवर नियंत्रण मिळवलं. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

## निळे गाव येथील २ परप्रांतीय तरुणांवर पोलिसांनी केली कारवाई

नालासोपारा :-

नालासोपारा पश्चिम निळेगाव येथे दोन पुरुष बांग्लादेशी नागरीक यांच्यावर कारवाई करुन आरोपी यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश अधिक माहितीनुसार नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रा. निळेगाव नालासोपारा प. ता. वसई जि. पालघर, याठिकाणी परकीय नागरीक अनधिकृत पणे भारतात राहत असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाली. त्यावेळी सदर परकीय नागरीकांवर नालासोपारा येथे जावुन कारवाई करण्याच्या सुचना देवून सदर बातमीची खातरजमा करुन पंच व पोलीस पथक जावून दि. २९/०७/२०२४ रोजी कारवाई करण्यात आली असून बांग्लादेशी दोन पुरुष नागरीक यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

१) हन्नन यासीन शेख, वर्ष धंदा - चिकन दुकानात काम. रा. स्नेहा नगर सोसा. फेस - ए, दुकान नं ०२, अजमेरी चिकन सेंटर दुकानात, निलरे गाव तलावासमोर, नालासोपारा प. ता - वसई मुळ रा - बाग पासरा पो. सोनाईमुर्जी तह-देवडी, जि- नोहाखाली बांग्लादेश २) शमीम मंडन शेख, रा-धंदा - चिकन दुकानात काम. रा. स्नेहा नगर सोसा. फेस-ए, दुकान नं ०२, अजमेरी चिकन सेंटर दुकानात, निळेगाव तलावासमोर, नालासोपारा प. ता - वसई मुळ रा- बाग पासरा पो.सोनाईमुर्जी तह - देवडी, जि - नोहाखाली बांग्लादेश देश बांग्लादेश, (आईचे नाव मनोआरा बेगम मंडन शेख देश - बांग्लादेश असे सांगितत्रे असून त्यांच्या कडे भारतात येण्याकरीता व्हिझा पासपोर्ट नसून ते अनधिकृत पणे भारतात प्रवेश करुन येवुन अवैधरित्या वास्तव करीत असल्याचे कबुल केले असून आरोपीवर नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंब्रे (गुन्हे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि सौरभी पवार व सफौ गवई, पोहवा किणी, पोहवा शेटये, पोहवा शिंदे, मपोहवा डोईफोडे, मपोहवा तिवले, मपोशि पाटील सर्व नेम अने. मा.वा. प्र. कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

## अवैध वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या पुरुषाकडून एका पीडित मुलीची पोलिसांनी केली सुटका

नालासोपारा -

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या पुरुष आरोपीस अटक करुन एका पिडीत महीलेची केली सुटका . मिळालेल्या माहितीनुसार नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील दूर्वा अपार्टमेंट रूम नं. ४०३ सी विंग, हनूमान नगर, मैत्री अपार्टमेंट जवळ नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर याठिकाणी एक पुरुष वेश्यादलाल हा वेश्यागमनाकरीता त्याचे राहत्या घरी मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोल्लरीस पथकास सदर ठिकाणी जाऊन कारवाई करण्याचे आदेश दिले.

अधिक माहितीअशी कि पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी बोगस गि-हाईक तयार करून त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेश्यादलाल याचे मोबाईल क्रमांकावर व्हॉट्सएप मॅसेज करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केल्ली असता आरोपीने एका मुलीचे ३०००/- रु. घेतो असे सांगुन आपणास कबुल असेल तर सी/४०३ दुर्वा अपार्टमेंट,छेडा नगर, राहुल इंटरनॅशनल स्कुल जवळ हनुमान नगर, नालासोपारा (प) येथे येण्यास सांगितत्रे त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह सदर ठिकाणी गेले असता वेश्यादलाल मल्हारी खंडु कसबे वय ३६ वर्षे याने बोगस गिऱ्हाईकास एक महीला दाखवली असता वेश्यादलालाने बोगस गिऱ्हाईक यास माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर महीलेस पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे त्यास पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक पुरुष दलाल आरोपीत नामे मल्हारी खंडु कसबे यास ताब्यात घेतले व पिडीत महिला हिची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.आरोपी याने पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळ्या ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना

वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ३०००/- रु. घेतो व त्यातील ५००/- रुपये पिडीत महीलांना देतो.तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करून नमूद पुरुष दलाल आरोपी यास अटक करून नालासोपारा पोलीस ठाणे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री. अंबुरे, (गुन्हे शाखा), सहायक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाल (गुन्हे शाखा), यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि सोरभी पवार व सफौ गवई, मपोहवा डोईफोडे, शेटये, किणी, चालक पोहवा पागी, तिवले, मपोशि पाटील सर्व नेम.अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

## झोपडपट्ट्यांच्या संख्येत होतीये वाढ; आता दुमजली झोपड्यांचा नवीन 'फंडा'

**नागपूर :**

शहरात विकासाची कामे जोरात सुरू आहेत. अनेक विकासकामांसाठी झोपडपट्ट्या हटविणे आवश्यक असले तरी आश्चर्याची बाब म्हणजे झोपडपट्ट्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. एकीकडे त्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढत आहे, तर दुसरीकडे लोकांनी आता दुमजली झोपड्यांचा नवा फंडा सुरू केला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये झोपड्यांची संख्या वाढण्याबरोबरच लोकसंख्याही वाढत आहे. अशा स्थितीत मूलभूत सुविधांना फाटा येऊ लागला आहे. याचा थेट परिणाम शहराच्या सौंदर्यावर होत आहे. नागपुरात झोपडपट्ट्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मुख्य भाग आणि रस्त्यांना लागून झोपड्या बांधल्या जात आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे झोपडपट्टीवासीय जागा सोडण्यास तयार नाहीत. जागेची कमतरता आणि वाढत्या कुटुंबामुळे झोपडीधारकांनी आता दुमजली झोपड्या बांधण्यास सुरुवात केली आहे.



सर्वेक्षणानुसार झोपडपट्ट्यांची संख्या आणि त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या संख्येत वाढ झाली आहे. शहरातील घोषित झोपडपट्ट्यांची संख्या 299 आणि अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या 129 आहे, तर त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांची संख्या सुमारे 2 लाख आहे. झोपड्यांमध्ये राहणाऱ्यांची संख्या दुपटीने वाढली आहे.

**घरकुल योजना तयार झाली असली तरी...**

घरकुल योजना तयार झाली असली तरी झोपडपट्टीवासीयांनी त्याचा वापर करणे टाळले आहे. झोपडपट्टीतील रहिवासी जागा सोडण्यास तयार नाहीत. यासोबतच दुमजली झोपड्या बांधून संकट वाढत आहे.

## IAS पद रद्द केल्याने पूजा खेडकरची दिल्ली उच्च न्यायालयात धाव

**पुणे:**

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतल्याची बातमी समोर आली आहे. संघ लोकसेवा आयोगाने आयएएस पद रद्द केल्याने पूजा खेडकरने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून लवकरात लवकर सुनावणी घेण्यात यावी अशी मागणी पूजा खेडकरने केली आहे. पूजा खेडकर अचानक चर्चेत आल्या. त्यांना परीविक्षाधीन सहायक जिल्हाधिकारी अधिकारी म्हणून पुण्यात नियुक्ती मिळाली. पूजा खेडकर यांनी प्रबोशनमध्ये असताना गाडीवर लाल दिवा, व्हीआयपी नंबर प्लेट असलेल्या खासगी ऑडी कारवर महाराष्ट्र सरकारचा बोर्ड लावण्याची मागणी केली होती. त्यामुळे कामापेक्षा अधिकारवाणी गाजवणाऱ्या पूजा खेडकर चर्चेत आली. मात्र आता



प्रशिक्षणार्थी कअर पूजा खेडकर हिला वढरउ ने नोकरीतून काढून टाकले आहे.

सध्या ती प्रोबेशनवर होती, मात्र कायमस्वरूपी नियुक्तीपूर्वीच तिची हकालपट्टी करण्यात आली. वादांच्या भोवऱ्यात सापडलेल्या पूजा खेडकरवर बनावट कागदपत्रांद्वारे नोकरी मिळवल्याचा आरोप होता. पूजा खेडकर 2022 ची वढरउ परीक्षा उत्तीर्ण झाली होती आणि सध्या ती महाराष्ट्रात ट्रेनी कअर म्हणून तैनात होती. पहिल्याच पोस्टिंगमध्ये त्यांनी अनेक सरकारी मागण्या केल्या होत्या. यावरून वाद वाढत असताना त्यांची पुण्याहून वाशीम येथे बदली करण्यात आली. एवढेच नाही तर नॉन क्रिमी लेयर ओबीसी आरक्षण मिळवण्यासाठी त्यांनी चुकीची कागदपत्रे दिल्याचे नंतर समोर आले. वढरउ ने त्यांना 30 जुलैला दुपारी 3:30 पर्यंत उत्तर देण्यासाठी वेळ दिला होता. या वेळेपर्यंत उत्तर न मिळाल्याने यूपीएससीने त्यांना सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय घेतला. एवढेच नाही तर आता ती यूपीएससीच्या कोणत्याही परीक्षेत सहभागी होऊ शकणार नाही. या संदर्भात यूपीएससीने त्यांना आधीच सांगितले होते की, निर्धारित वेळेत उत्तर न मिळाल्यास कारवाई केली जाईल आणि नंतर त्यांच्या कोणत्याही अजार्चा विचार केला जाणार नाही. उरए-2022 परीक्षेच्या मानकांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पूजा खेडकर दोषी आढळल्याचे लोकसेवा आयोगाने म्हटले आहे. पूजाने नियमांच्या पलीकडे जाऊन चुकीच्या कागदपत्रांद्वारे अतिरिक्त संधी मिळवली. आता वढरउ ने पूजा खेडकरला भविष्यात कोणत्याही परीक्षेला बसण्यास बंदी घातली आहे.

## उद्धव ठाकरे, संजय राऊतांची जागा नागपूरच्या पागलखान्यात; बावनकुळेंचा पलटवार

**नागपूर :**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांना मानसिक आजार झाला आहे. त्या दोघानांही नागपूरच्या पागलखाण्यात भरती करण्याची वेळ आली आहे, अशा सणसणीत शब्दांत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. उद्धव ठाकरे यांनी पुण्यात आयोजित शिवसंकल्प मेळाव्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहांसह उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीसांवरही चांगलीच आगपाखड केली.ही आगपाखड भाजपच्या चांगलीच जिव्हारी लागल्याचे दिसत आहे. आता उद्धव ठाकरेंच्या टीकेला बावनकुळेंनी उत्तर दिले आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, उद्धव सेना औरंगजेबाच्या वृत्तीत आली आहे. ते धर्म आणि मतांचे राजकारण करत आहेत. ठाकरे गटाच्या सकाळच्या टेप रेकॉर्डने कधीतरी विकासाच्या मुद्द्यावरही बोलले पाहिजे. पण उद्धव ठाकरे यांनी पुढचे भाषण विकासाच्या मुद्द्यावर करून दाखवावं, असे आव्हानही यावेळी बावनकुळेंनी दिले आहे. लाडकी बहीण योजनेला प्रतिसाद मिळत असल्याने विरोधकांच्या पोटात दुखायला लागले आहे.

ते पैसे मिळू नयेत म्हणून त्यांचे प्रयत्न



सुरू आहेत. पण या योजनेत बहिणींना पैसे मिळणार असतील तर ते पैसे काही पैसे उद्धव ठाकरे, नाना पटोले, संजय राऊत यांच्या घरातून जाणार नाहीत असा टोलाही बावनकुळेंनी लगावला. बावनकुळे म्हणाले, हा जनतेचा पैसा आहे. कितीही पैसे लागले तरी सरकारने मागेपुढे पाहू नये. शेतकऱ्यांना जे द्यावे लागेल ते द्यायला हवे. एखादा रस्ता नाही झाला तरी चालेल पण जनतेला पैसे कमी पडू नये, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.

## कैदेतील वाझेला मीडियाशी बोलण्याची परवानगी कशी?

**मुंबई :**

निलंबित पोलीस अधिकारी व सध्या गंभीर गुन्ह्याखाली कैदेत असलेल्या सचिन वाझेनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर आरोप करण्यामागे कोणती शक्ती आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. कोठडीत असलेल्या आरोपीला मीडियाशी बोलण्याची परवानगी नाही मग सचिन वाझेलाच मीडियाला बोलण्याची परवानगी कोणी दिली, याची चौकशी झाली पाहिजे तसेच सचिन वाझेच्या बंदोबस्तासाठी जे पोलीस होते त्यांना तात्काळ निलंबित केले पाहिजे, अशी मागणी प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. लोंढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष यंत्रणांचा कसा गैरवापर करते हे आम्ही वारंवार उघड केले आहे. मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमवीरसिंह यांच्या माध्यमातून भाजपाने मविआ सरकारमधील नेत्यांवर खोटे आरोप करुन त्यांना गोवण्यासाठी षडयंत्र रचले होते. आताही माजी गृहमंत्री अनिल देशमुख व श्याम मानव यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पोलखोल केल्याने फडणवीस यांचा भ्रष्ट चेहरा उघडा पडला, आपले बिंग फुटले असून, असत्य लपवण्यासाठी कैदेत असलेल्या सचिन वाझेला पुढे करण्यात आले आहे.



पोलीस
बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार, ०६ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०२४

# हल्लेप्रकरणात तिघांना अटक, सरपंचासह 5 फरार

**अलिबाग :** कर्जत तालुक्यातील पळसदरीमध्ये जमिनीच्या वादातून अनिल हरिश्चंद्र देशमुख आणि रोहित मोहिते यांच्यावर 25 जून रोजी जीवघेणा हल्ला झाला होता. या प्रकरणी रायगड पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. तर आरोपी सरपंचासह पाचजण फरार आहेत.

पळसदरीमधील अनिल हरिश्चंद्र देशमुख आणि रोहित मोहिते हे 25 जून रोजी कारने नांगुलेर्हून भिलवडेला जात होते. त्यावेळी कारमधून आलेल्या पाचजणांनी त्यांना माहिती विचारण्याच्या बहाण्याने थांबवले आणि त्यांच्यावर लोखंडी रॉडने जबरदस्त हल्ला केला. या प्रकरणी अनिल देशमुख यांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आणि तक्रारीत जयेंद्र गजानन देशमुख, प्रशांत सूर्यकांत देशमुख, गजानन बाळाराम देशमुख, योगेश वसंत देशमुख, विवेक विश्वनाथ देशमुख, श्रीराम बाळाराम देशमुख, सचिन गजानन देशमुख (सर्व म्हारळगाव ता. कल्याण, जि.ठाणे) यांची संशयित म्हणून नावे दिली. तसेच 5 अनोळखी व्यक्तींचा उल्लेख होता.

कर्जत पोलिसांनी योगेश वसंत देशमुख याला त्याच दिवशी अटक केली. पण, अनोळखी आरोपींची माहिती मिळत नव्हती. हा गुन्हा गुंतागुंतीचा असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना करत या गुन्ह्याचा पुढील तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला करण्याचा आदेश दिला.

त्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी सहा. पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर, सहाय्यक फौजदार प्रसाद पाटील, संदीप पाटील, हवालदार सुधीर मोरे, पश्याम कराडे, प्रतिक सावंत, राकेश म्हात्रे, अक्षय जाधव, ईश्वर लांबोटे व सायबर पोलीस ठाणेतील, अक्षय पाटील यांचे पथक बनवले. त्यानंतर गोपनीय माहिती तसेच सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणच्या आधारे गुन्ह्यातील 5 अनोळखी आरोपींचा शोध घेतला. ते कल्याण तालुक्यातील म्हारळ गावात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर शुभम राजेंद्र कांगणे (26, म्हारळगाव, कल्याण), नंदेश मिलिंद खताते (22, म्हारळगाव, कल्याण) यांना 2 ऑगस्ट रोजी ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली.

त्यावेळी पळसदरीचा सरपंच जयेंद्र देशमुख, प्रशांत देशमुख यांच्या सांगण्यावरून हल्ला केल्याची माहिती दिली. त्यासाठी राजेश सिंग, नितेश सिंग आणि बंटी कांबळे (सर्व म्हारळगाव, कल्याण) यांची मदत घेतल्याचे सांगितले. त्याच मध्यरात्री पोलिसांनी शुभम कांगणे आणि नंदेश खताते यांना अटक केली. तर सरपंच जयेंद्र देशमुख, प्रशांत देशमुख, राजेश सिंग, नितेश सिंग आणि बंटी कांबळे हे फरार आहेत. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले तीन लोखंडी रॉड, कार जप्त केली आहे. सर्व आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या मोहिमेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले.

# ठाणे जिल्ह्याची चौफेर कोंडी; वसई फाट्यावर ट्रक उलटल्याने १५ तास वाहतूक ठप्प

**ठाणे, वसई :** ठाणे जिल्ह्यात पावसाचा जोर शनिवारी दिवसभर कायम असतानाच, पहाटे ३ वाजता मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई फाट्याजवळ हायड्रोजन सिलिंडर वाहून नेणारा ट्रक उलटल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. मुंबई व गुजरात या दोन्ही मार्गिकांवर ८ ते १० किलोमीटर रांगा लागल्या होत्या. घोडबंदर मार्गे वसईच्या दिशेने जाणारी वाहतूक मुंबई-नाशिक आणि जुना मुंबई-आग्रा मार्गावरून वळविण्यात आल्याने या मार्गांवर भार वाढून कोंडी झाली. अखेर वाहतुकीसाठी बंद असलेल्या घोडबंदर मार्गावर वाहने सोडून ती फाऊंटेन हॉटेल ते गायमुख घाट परिसरात रोखून धरण्यात आल्याने त्याचा फटका शहरातील अंतर्गत मार्गांनाही बसला. वसई फाट्याजवळील अपघातात सिलिंडर गळती होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत होती. उरण येथील जेएनपीटी बंदरातून घोडबंदर मार्गे गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूकही ठप्प झाली. या मार्गावरील वाहतूक मुंबई-नाशिक महामार्ग आणि मुंबई-आग्रा महामार्ग येथून भिवंडी मार्गे गुजरातच्या दिशेने वळविण्यात आली. कशेळी,काल्हेर, अंजुरफाटा, कोपर या



अंतर्गत मार्गांवर वाहनांचा भार वाढून कोंडी झाली. शिवाय, ठाण्यातून जाणाऱ्या मुंबई-नाशिक मार्गावरील तीन हात नाका, नितीन कंपनी, कॅडबरी, माजिवाडा, कापूरबावडी या भागात वाहतूक कोंडी झाली होती. माजिवडा भागात ट्रक बंद पडल्याने कोंडीत भर पडली. वाहतूक कोंडी वाढू लागताच वाहतूक पोलिसांनी अवजड वाहतुकीसाठी बंद असलेल्या घोडबंदर मार्गावरून अवजड वाहने सोडण्यास सुरुवात केली. ही वाहने पुढे फाऊंटेन हॉटेल ते गायमुख घाट येथे एका मार्गिकेवर रोखून ठेवण्यात आली. या वाहनांच्या रांगा कापूरबावडीपर्यंत आल्याने त्याचा फटका शहरातील अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीला बसला.

भिवंडीत आंदोलन गेल्या काही दिवसांपासून भिवंडी ग्रामीण म्हणजेच कशेळी-काल्हेर भागातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-आग्रा महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. या भागात मोठी गोदामे असून तेथील रस्त्यांवर खड्डे आहेत. यामुळे वाहतूक संथगतीने होऊन कोंडी होते. यामुळे संतप्त झालेले पालक, शिक्षकासह विद्यार्थ्यांनी कोपर भागातील रस्त्यावर शुक्रवारी सायंकाळी ठिय्या मांडला. वाहतूक पोलिसांनी भेट घेऊन समजूत काढल्यानंतर पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले आणि या मार्गावरील वाहतूक सुरू झाली.

जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला ठाणे जिल्ह्यात शनिवारी सकाळपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू होता. ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी शहरासह इतर शहरांमध्ये सखल भागात पाणी साचले होते. ठाणे शहरात सकाळी ८.३० ते दुपारी ५.३० या कालावधीत ७८.४६ मिमी पाऊस झाला. पावसादरम्यान, तुळशीधाम भागातील धर्मवीर नगर परिसरात असलेला लोखंडी बस थांबा पडला. दोन ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. अंबरनाथ, उल्हासनगर तसेच बदलापूर शहरात शनिवार सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू होती. दुपारी तिन्ही शहरांमध्ये पावसाचा जोर वाढला.

वसई फाटा येथे झालेल्या अपघाताने शनिवारी पहाटे मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पंधरा तासांपेक्षा अधिक काळ वाहतूक कोंडी होती. यावेळी आठ ते दहा किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा होत्या. महामार्गावर अपघातामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. सिलिंडरमध्ये हायड्रोजन असल्याने विलंब झाला. सिलिंडर व ट्रक बाजूला केल्यानंतर पुन्हा वाहतूक पूर्वपदावर आली.-विठ्ठल चिंतामण, पोलीस उपनिरीक्षक, महामार्ग पोलीस, चिंचोटी केंद्र

# मोफा कायद्याचे भवितव्य पुन्हा महाधिवक्त्यांवर अवलंबून! सुधारणा करण्याचा प्रयत्न तूर्त अयशस्वी

**मुंबई :** महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट कायद्यात (मोफा) दुरुस्ती करून स्थावर संपदा कायद्यान्वये (रेरा) नोंदणी न झालेल्या गृहप्रकल्पांनाच हा कायदा लागू करण्याबरोबरच मानीव अभिहस्तांतरणाच्या कलमातूनही बड्या विकासकांची सुटका करण्याचा न्याय व विधि विभागाचा प्रस्ताव महाधिवक्त्यांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला आहे. त्यामुळे आता मोफा कायदा अस्तित्वात आहे किंवा नाही, याबाबत महाधिवक्त्यांना स्पष्ट करायचे आहे.पावसाळी अधिवेशनात हे दुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्याचा न्याय व विधि विभागाचा प्रयत्न होता. रेरा कायदा हा दंडात्मक कारवाई सुचवितो तर मोफा कायद्यात कसूरदार विकासकांविरुद्ध थेट फौजदारी कारवाईची शिफारस आहे. त्यामुळे मोफा कायदा रद्द व्हावा, अशीच विकासकांची इच्छा आहे. त्यामुळेच महाधिवक्त्यांचा अभिप्राय महत्त्वाचा आहे.

रेरा कायदा अमलात आल्यामुळे मोफा कायदा रद्द झाल्याची ओरड विकासकांकडून गेली अनेक वर्षे केली जात आहे. मात्र हा कायदा अस्तित्वात असल्याबाबत न्याय व विधि विभागानेच अभिप्राय दिला होता. या अभिप्रायानुसार मोफा कायद्यातील करारमाना न करणे तसेच सक्षम प्राधिकरणाची नियुक्ती, मानीव अभिहस्तांतरणाबाबत टाळाटाळ आदी कलमे लागू असल्याचे म्हटले होते. रेरा कायदा अस्तित्वात असतानाही मोफा कायदा प्रामुख्याने मानीव अभिहस्तांतरणाबाबत लागू केला जात होता. त्यामुळे हा कायदा रद्द व्हावा, या दिशेनेही हालचाली सुरू होत्या. परंतु त्यात यश आले नाही. त्यामुळे या कायद्यात दुरुस्ती करून तो फक्त रेरा नोंदणी नसलेल्या प्रकल्पांना लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. याबाबतचे वृत्त ह्यलोकसत्ताह्णने सर्वप्रथम दिले. पावसाळी अधिवेशनातच हे दुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्याचा शासनाचा प्रयत्न होता. परंतु हा प्रयत्न यशस्वी होऊ शकलेला नाही.रेरा कायदा अस्तित्वात आल्यामुळे मोफा कायदा रद्द झाल्याचा दावा उच्च न्यायालयातील एका प्रकरणात करण्यात आला होता. त्यामुळे उच्च न्यायालयाने गृहनिर्माण विभागाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते. गृहनिर्माण विभागाने न्याय व विधी विभागाकडून अभिप्राय मागविला. या विभागाने सुरुवातीला मोफा अस्तित्वात असल्याचे तर नंतर केंद्र सरकार व राज्याचे कायदे असतात तेव्हा केंद्र सरकारचा कायदा सरस ठरतो, असे स्पष्ट करीत मोफा रद्द झाल्याचा अभिप्राय दिला. मात्र २०१४ मधील गृहनिर्माण कायद्यामुळे मोफा रद्द झाला होता.

परंतु रेरा कायद्यामुळे गृहनिर्माण कायदा रद्द झाल्याने मोफा कायदा अस्तित्वात असल्याचे गृहनिर्माण विभागाचे मत होते. परिणामी महाधिवक्त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यांनीही संदिग्ध मत व्यक्त केले. अखेरीस मोफा रद्द करण्याऐवजी त्याचे महत्त्व कमी करण्याच्या हेतूने हा कायदा फक्त रेरात नोंदणी नसलेल्या गृहप्रकल्पांना लागू असल्याची तसेच मानीव हस्तांतरणाबाबतच्या ११ व्या कलमानंतर ११ (अ) अशी दुरुस्ती सुचवित हे कलम रेरा नोंदणी नसलेल्या गृहप्रकल्पांना लागू राहील असे नमूद केले. त्यामुळे बडे विकासक मानीव अभिहस्तांतरणाबाबतच्या तरतुदीतूनही मोकळे सुटले असते. मात्र मानीव अभिहस्तांतरणाबाबतच्या उपकलमाला गृहनिर्माण विभागाने आक्षेप घेतल्यामुळे आता याबाबत महाधिवक्त्यांचे मत मागविण्याचे ठरविण्यात आले आहे.

# महामार्गावर हायड्रोजन गॅस सिलेंडर वाहून नेणारा ट्रक उलटला, वसई फाट्याजवळ पहाटे झाला अपघात

**वसई:** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई फाट्याजवळ हायड्रोजन सिलेंडर वाहून नेणाऱ्या ट्रकला अपघात झाला. शनिवारी पहाटे तीनच्या सुमारास गुजरात दिशेच्या मार्गावर ही घटना घडली. यात चालक जखमी झाला आहे, तर दुसरीकडे सिलेंडर रस्त्यावर पडल्याने आग लागली होती. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून गुजरातच्या दिशेने जी जे १२ बी वाय २२५५ या क्रमांकाचा ट्रक हायड्रोजन सिलेंडर घेऊन निघाला होता. मात्र वसई फाट्याजवळ पोहोचताच वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि थेट दुभाजकाच्या मध्ये जाऊन उलटला. यावेळी त्यात असलेले सिलेंडर हे मुख्य रस्त्यावर पडले अचानकपणे आगही लागली होती. तातडीने पालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. त्यांनी अग्निबंबाच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले. कोणत्याही प्रकारची जीवितहानी होऊ नये यासाठी मुंबई व गुजरात वहिनी वरील सर्व वाहतूक सुरक्षित अंतरावर्ती थांबवून ठेवण्यात आली होती अशी माहिती चिंचोटी केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल चिंतामण यांनी दिली आहे. आग नियंत्रणात आल्यानंतर अपघातग्रस्त वाहन व रस्त्यावर पडलेले सिलेंडर क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**दुरध्वनी क्र. ९६६५००३८८७**
**वालीव नाका, वसई (पूर्व)**
**ता.वसई, जि. पालघर - ४०१२०८**

**ईमेल -** phabhagsamitiwaliv@gmail.com
**जावक क्र. वविशम/११६७/२०२४-२५**
**दिनांक -०१/०८/२०२४**

## जाहिर नोटीस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत लेखी स्वरुपात हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वालीव | व्ही.एल.०५/३९७६/१ | इमरान भाऊद्दीन कपुर | अब्दुल अझीझ खान |
| २ | वालीव | व्ही.एल.०३/९३५ | विमलकुमार सिंघानीया | आख्तर जहॉ सैय्यद आसिफ मलीक |
| ३ | वालीव | व्ही.एल.०५/७६४४/७ | सुखदेव दत्तु वामन | युसुफ नुरमोहम्मद भाई अढीया |
| ४ | वालीव | व्ही.एल.०५/७६४४/३ | सुखदेव दत्तु वामन | हंजला हारुनभाई बसन |
| ५ | वालीव | व्ही.एल.०५/७६४४/४ | सुखदेव दत्तु वामन | हांजला हारूनभाई बसन |
| ६ | वालीव | व्ही.एल.०३/५७७३/१६ | नोरमन एडवीन अमन्ना | प्रमिलादेवी मुकेश गुप्ता |
| ७ | वालीव | व्ही.एल.०१/५२१५/११ | अमृत डी जैन | केतन भरत टांक |
| ८ | वालीव | व्ही.एल.०५/७६६३ | बिलाल अहमद साकीर अली | अब्दुल अझीझ फहीमुल्लाह खान |
| ९ | वालीव | व्ही.एल.०१/२५७/२ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| १० | वालीव | व्ही.एल.०१/२५७/१३ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| ११ | वालीव | व्ही.एल.०१/२५७/१४ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| १२ | वालीव | व्ही.एल.०१/२५७/१७ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| १३ | वालीव | व्ही.एल.०१/२५७/९ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| १४ | वालीव | व्ही.एल.०१/२५७/१६ | भालचंद्र धमार्जी भगत | रेखा जगदीश सुतार |
| १५ | वालीव | व्ही.एल.०१/२३८/४ | मधुकर कोशिबा म्हरनुर | सचीन द्वारकानाथ पायगावकर |
| १६ | वालीव | व्ही.एल.०४/१३७० | गायत्रीदेवी परमेश्वरलाल शर्मा व १ | निरज परमेश्वरलाल शर्मा |
| १७ | वालीव | व्ही.एल.०३/७१५६/११ | अब्दुल बि इनामदार | प्रकाश शिवाजी लोखंडे व १ |
| १८ | वालीव | व्ही.एल.०१/५७५३/११ | राजुराम सवाजी पुरोहीत | अजय शामराव सोनावणे |
| १९ | वालीव | व्ही.एल.०५/६११९ | यशनाथ शंखचिल्ली विश्वकर्मा | निशा यशनाथ विश्वकर्मा वारसा हक्काने |
| २० | वालीव | व्ही.एल.०४/३४४६/३८ | पिराजी बी जाधव | सुप्रीया रमेश जोशी व रमेश शंकर जोशी |

**सही /-**
**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वसई विरार शहर महानगरपालीका**

# गटारी जीवावर बेतली! पार्टीसाठी गेलेले 5 जण नदीत बुडाले; एकाचा मृत्यू, एक बेपत्ता



**मुंबई :** सर्वत्र गटारीचा उत्साह सुरु होता. सगळीकडे मटण आणि मासे खरेदी करण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत. श्रावण सुरु होणार असल्याने सर्वचजण गटारी साजरी करण्यासाठी नॉन व्हेज पार्ट्यांचे आयोजन करत आहेत. मात्र हा उत्साह सुरु असतानाच एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. गटारीची पार्टी करण्यासाठी गेलेले 5 जण नदीत बुडाल्याची घटना घडली आहे. मुंबईतील तानसा नदी क्षेत्रात ही घटना घडली आहे. यातील तिघांना वाचवण्यात यश आलं आहे, तर एकाचा मृत्यू झाला आहे. एकाचा शोध सुरु आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शहापूर तालुक्यातील तानसा नदी क्षेत्रात 5 जण गटारीची पार्टी करण्यासाठी गेले होते. हे सर्वजण धरणाच्या 1 नंबर गेटच्या जवळ गाडीमधून बसून पार्टी करत होते. मात्र यावेळी अचानक तानसा धरणाचे स्वयंचलित २४ दरवाजे उघडण्यात आले. त्यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु झाला. अचानक पाणी सुरु झाल्याने पाचही जण गाडीसह नदीच्या प्रवाहाच्या दिशेने वाहू लागले. यावेळी त्यातील तिघांना गाडीच्या बाहेर उडी मारली, तर दोन जण गाडीमध्येच अडकले.

पाण्याचा प्रवाह वाढत गेल्याने गाडी अगदी काही क्षणातच नदी पात्रात बुडाली. त्यामुळे उर्वरित दोघांना पाण्यातून बाहेर येणं कठीण झालं. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने तात्काळ बचावकार्य सुरु केलं. या शोध कार्यात एकाचा मृतदेह सापडला तर एक जण अजूनही बेपत्ता आहे. बेपत्ता तरूणाचा शोध सुरु आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई आणि कल्याण क्षेत्रातील 5 मित्र शहापूर तालुक्यातील तानसा नदी क्षेत्रात गटारीची पार्टी करण्यासाठी गेले होते. हे मित्र धरणाच्या 1 नंबर गेटच्या जवळ गाडीमधून बसून पार्टी करत होते. मात्र यावेळी अचानक तानसा धरणाचे स्वयंचलित २४ दरवाजे उघडण्यात आले. त्यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु झाला. पाण्याच्या प्रवाहात चही जण गाडीसह नदीच्या दिशेने वाहू लागले. यावेळी त्यातील तिघांना गाडीच्या बाहेर उडी मारली, तर दोन जण गाडीमध्येच अडकले. बुडालेल्या एकाचा मृतदेह सापडला असून दुसरा तरूण बेपत्ता आहे. दुसऱ्या बेपत्ता तरुणाचा शोध सुरू आहे.

पावसाळ्यात नदी, धरणं, धबधबा अशा ठिकाणी पर्यटकांना जाण्यासाठी बंदी घातली जाते. पावसाळ्यात अशा ठिकाणी अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात असते. ठाणे आणि मुंबईतसुध्दा पावसाळ्यात धरण, तलाव, नदी, धबधब्याच्या ठिकाणी पर्यटकांना जाण्यासाठी जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. मात्र तरीसुध्दा पर्यटक स्वतःचा जीव धोक्यात घालून अशा ठिकाणी जातात. गेल्या काही दिवसांपासून धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. अशा परस्थितीत कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी धरण, तलाव, नदी, धबधब्याच्या ठिकाणी पर्यटकांना पिकनीकसाठी जिल्हा प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली आहे.

# संपादकीय

## स्पर्धा परीक्षांची दुकानं



संपादक दिपक मोरेश्वर नाईक


दिल्लीतील ओल्ड राजेंद्र नगर भागात पावसाचे पाणी कोचिंग सेंटरच्या बेसमेंटमध्ये शिरून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तीन तरुण मुलांचा मृत्यू झाला. स्पर्धा परीक्षेची स्वप्नं विकणारी ही दुकानंच आहेत. तेथील स्थिती आणि नागरी सेवा परीक्षांबाबतचा दृष्टिकोन कधी बदलणार, हा प्रश्न आहे. दिल्लीतल्या ओल्ड राजेंद्र नगर भागातील एका कोचिंग सेंटरच्या बेसमेंटमध्ये पावसाचं आणि फुटलेल्या गटाराचं पाणी भरून झालेल्या दुर्घटनेत तीन तरुण मुलांचा मृत्यू झाला. या विषयीच्या बातम्या, त्यावर वेगवेगळ्या व्यासपीठांवर चालू असलेला गदारोळ, सरकारची कारवाई, राज्यकर्त्यांची तात्पुरती मलमपट्टी या सर्वांच्या पलीकडे जाऊन माझ्या मनावर जे चित्र सतत उमटत राहतं, ते त्या तीन तरुण मुलांची छायाचित्रे आणि त्या संपूर्ण परिसरात निदर्शनं करणारे तरुण-तरुणी. मी दिल्लीत राहते. ही मुलं ज्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत होती, ती परीक्षा मी दिली आहे आणि याच राजेंद्र नगर भागात अगदी थोड्या काळासाठी का होईना, पण मी २३ वर्षांपूर्वी राहिले आहे; म्हणूनही या घटनेच्या निमित्ताने काही मुद्द्यांवर आपण समाज म्हणून विचार केला पाहिजे, असं मला वाटतं. ओल्ड राजेंद्र नगर, मुखर्जी नगर, कटवारीया सराय ही यूपीएससीची नागरी सेवा परीक्षांची मोठी केंद्रं आहेत. ह्यकेंद्रह्ण या शब्दामुळे एखादी इमारत, असं कोणाच्या डोळ्यासमोर येत असेल तर तो गैरसमज आहे. ओल्ड राजेंद्र नगरमध्ये कोचिंग क्लासेस आहेत, त्यांच्या अभ्यासिका आहेत, स्पर्धा परीक्षांची पुस्तकं - नोट्स पुरवणारी दुकानं आहेत, कोचिंगला येणाऱ्या मुलांची राहण्याची व्यवस्था असणाऱ्या अनेक इमारती आहेत, या इमारतींमधून राहणाऱ्या मुलांना टिफिन पुरवणारी मंडळी आहेत, या घरांमधून सफाई इत्यादी काम करणारे हेल्पर्स आहेत, कोचिंग-निवास-खानपान असं पॅकेज मिळवून देणारे दलाल आहेत, वेगवेगळे क्युझिन पुरवणारे फूड जॉइंट्स आहेत. ही एक वेगळीच दुनिया आहे, जिथे स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होऊन आयएएस किंवा आयपीएस होण्याची स्वप्नं पाहिली जातात आणि ती स्वप्नं इथे विकली पण जातात. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात, बेरोजगारी किंवा नोकरी-व्यवसायाच्या मर्यादित संधी, हा गंभीर प्रश्न आहे. रोजगाराच्या संधी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढत नाहीत. खासगी क्षेत्रातल्या नोकऱ्यांमध्ये सरकारी नोकऱ्यांसारखी सुरक्षितता नाही, समाज म्हणून आजही आपल्याला जिल्हाधिकारी-एसपी यांचं वाटणारं आकर्षण या सगळ्या घटकांमुळे स्पर्धा परीक्षा देण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढलेला आहे. आता स्पर्धा परीक्षा म्हटल्यावर चुरशीची लढाई आली, ती लढाई जिंकण्यासाठी लागणारी मेहनत आली. अर्थशास्त्रात एक तत्त्व आहे, मागणी तसा पुरवठा. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी कोचिंग क्लासेस सुरू झाले. या क्लासेससाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून मुलं यायला लागली. मग त्या मुलांच्या राहण्याच्या, खाण्यापिण्याच्या गरजा भागवण्याची गरज निर्माण झाली. या सगळ्या सेवा एकाच ठिकाणी मिळाल्या तर विद्यार्थ्यांची मोठीच सोय झाली म्हणायची. या सगळ्या सेवा पटापट पुरवण्यामागे मोठी आर्थिक गणितं आहेत, हे कोणालाही सहजच कळेल. ज्या झपाट्यानं या सेवांची मागणी वाढली, त्या झपाट्यानं सेवा पुरवणं - आणि त्याही सर्व नियम पाळून पुरवणं - शक्यच नव्हतं. मग बेसमेंटमध्ये लायब्ररी करा, बंगला पाडून बिल्डिंग बांधा, नियम धाब्यावर बसवून खाण्यापिण्याच्या गाड्या लावा, हे प्रकार सुरू झाले. सन २००१मध्ये मी जेव्हा ओल्ड राजेंद्र नगरमध्ये राहत होते, तेव्हा तिथे अनेक टुमदार बंगले होते. इथल्या बंगल्यांच्या मालकांनी तळमजल्यावरच्या खोल्या मुलांना भाड्याने द्यायच्या आणि वरच्या मजल्यावर आपण राहायचं, अशी सुरुवात केली होती; पण यथावकाश यातले बरेच बंगले पाडले गेले आणि वेगानं इमारती उभ्या राहिल्या. या सगळ्या सेवा उपलब्ध झाल्यावर कोचिंग क्लासेस भरभरून चालणार होते. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन या सेवा-सुविधा पुरवायचे प्रयत्न केले. हाच या भागाचा अनिर्बंध विकास. गेल्या आठवड्यात झालेली दुर्घटना हा आश्चर्यकारक अशासाठी नाही, कारण अशा आपत्ती ओढवून घेण्याची परिस्थिती इथे अनेक वर्षांपासून होती. सरकारी यंत्रणेत येऊन काम करण्याची, व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्याची स्वप्नं उराशी बाळगणाऱ्या आणि त्यासाठी अतोनात मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची सुरुवात अशा अनिर्बंध व्यवस्थेमध्ये व्हावी, यासारखी शोकांतिका नाही. म्युनिसिपल कमिशनर होण्याची स्वप्नं बघणारी एखादी श्रेया यादव परवानगीशिवाय सुरू असलेल्या बेसमेंटमध्ये पाणी भरून मृत्युमुखी पडते, ही समाज म्हणून आपल्याला खडबडून जागे करणारी घटना असायला हवी. या संबंधित अनेक प्रश्न आहेत. स्पर्धा परीक्षा आणि त्यातून मिळणाऱ्या नागरी सेवांमधल्या नोकऱ्या यांचं खूप ग्लोरिफिकेशन होत आहे का? समाजमाध्यमांचा या ग्लोरिफिकेशनमध्ये मोठा वाटा आहे का? रोजगाराच्या इतर आकर्षक संधी नाहीत म्हणून तरुण मुलं या पर्यायाचा विचार करत आहेत का? आर्थिक क्षमता नसतानासुद्धा महागडे कोचिंग क्लासेस मुलांना लावणारे पालक हा मुलगा/मुलगी सेवेत आल्यावर हे सगळे पैसे दामदुपटीने वसूल करेल, असा विचार करतात का? नियम पाळणं ही शिस्त, समाज म्हणून आपण विसरायला लागलो आहोत का? आपल्या डोळ्यांदेखत एखादी चुकीची-बेकायदा गोष्ट होत असेल तर आपण त्याकडे दुर्लक्ष करतो का? हे सगळे कठीण प्रश्न आहेत आणि त्यांची उत्तरं साधी-सरळ-सोपी नाहीत. एका बेसमेंटमध्ये पाणी भरून अपघात झाल्यावर परिसरातल्या सर्व बेसमेंट सेवा बंद करणे, हा काही कायमस्वरूपी उपाय नाही. मुळात, नियमांच्या विरोधात बेसमेंट कसं उभं राहिलं आणि वर्षानुवर्षे चालू कसं राहिलं, हा मुख्य प्रश्न आहे. हे प्रश्न मुळापासून सोडवले गेलं नाहीत तर हाही प्रकार थोडे दिवस चघळून विसरला जाईल. आज ओल्ड राजेंद्र नगरमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे आईवडील समजावतील, की ह्यहे सगळं सोड आणि अभ्यासाला लाग. तुला परीक्षा द्यायची आहे आणि मोठा अधिकारी व्हायचं आहे. कशाला वेळ फुकट घालवायचा? तू स्वतःची काळजी घे आणि अभ्यास कर. कोचिंग क्लासेसच्या व्यवसायावरच गदा आल्याने तीही मंडळी कामाला लागतील आणि हळूहळू आपला कारभार सुरू करतील. आधी ऑनलाइन क्लास घेतील, मग छोट्या बॅचेस घेतील. बेसमेंट तात्पुरती बंद राहतील, पावसाळा गेला की, पुनःश्च सुरू होतील. सध्याच्या गदारोळात वृत्तवाहिन्या ओल्ड राजेंद्र नगरमध्ये पोहोचतील, तिथली परिस्थिती कशी आहे, याचे नाट्यमय व्हिडीओ, बातम्या दाखवतील. तिथली परिस्थिती कशी गंभीर आहे याबद्दल तावातावाने बोलतील. मुलंही त्यांना भावनेच्या भरात प्रतिसाद देतील. पण या सगळ्यामुळे मूळ प्रश्न सुटेल का? आणखी एखादी घटना घडली, की मीडिया तिथे धावेल. नंतर याच मुलांना आपलं रुटीन चालू ठेवायचं आहे. आईवडिलांनी कोचिंगचे, दिल्लीत राहण्याचे प्रचंड पैसे खर्च केले असतील त्याचा विचार करून परीक्षेची तयारी करायची आहे. मूळ प्रश्न, हजारभर हुद्द्यांसाठी लाखोंनी उमेदवार परीक्षा देतात आणि त्या परीक्षेतलं यश त्यांच्यासाठी इतकं महत्त्वाचं असतं, की त्यासाठी अमाप खर्च करण्याची त्यांची तयारी असते. प्रश्न हा आहे, की डॉक्टर किंवा इंजिनीअर झाल्यावरसुद्धा नागरी सेवेकडे वळावं असं तरुण तरुणींना वाटत आहे. समाजसेवा-व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणणे, अशी उदात्त ध्येय ठेवून येणारे तरुण किती आणि नोकरीची शाश्वती आहे-मान मरातब आहे- अयोग्य मार्गानं पैसे कमावण्याची संधी आहे, म्हणून येणारे तरुण किती, हेही एकदा शोधलं पाहिजे. आपल्याकडे डेमोग्राफिक डिव्हिडंड बद्दल नेहेमी बोललं जातं. या तरुण लोकसंख्येचे देशाला फायदे हवे असतील तर त्यांना कौशल्यं शिकवली पाहिजेत, त्यांना विविध क्षेत्रांत नोकरी-व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ज्या प्रमाणात तरुण लोकसंख्या वाढली, त्या प्रमाणात इतर सोयी-सुविधा-संधी-यंत्रणा उभ्या राहिल्या नाहीत, तर ही तरुणाई हिंसेचे मार्ग स्वीकारेल. ओल्ड राजेंद्र नगरमधल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनांबद्दलच्या बातम्या पाहत असताना माझ्या एका सहकारी अधिकाऱ्याने नोंदवलेलं निरीक्षण फार महत्त्वाचं आहे. तो म्हणाला, या वर्षीची प्रीलिम जी मुलं पास झाली नाहीत ना, तीच मुलं ही निदर्शनं करत आहेत. कारण त्यांना अपयशाने निराशा आली आहे. जी मुलं प्रीलिम परीक्षा पास झाली, त्यांना दोन तीन महिन्यांत मुख्य परीक्षा द्यायची आहे. त्यांना पुढच्या यशाची आशा आहे आणि म्हणून ती अभ्यासाला लागली आहेत. स्पर्धा परीक्षेची प्रक्रियाच चालते वर्षभर. सर्व टप्प्यांवर यशस्वी होत गेलं, तर वर्ष, पण एखाद्या टप्प्यावर यश नाही आलं तर पूर्ण परीक्षा पुन्हा द्यावी लागते, म्हणजे आणखी एक वर्ष. प्रत्यक्ष परीक्षा देण्याआधी साधारण वर्षभर आधी परीक्षेची तयारी सुरू होते. या काळात अभ्यासाव्यतिरिक्त फार कशाचा विचार करताच येत नाही तरुणांना. परीक्षा किती वेळा देता येईल आणि कुठच्या कॅटेगरीतल्या लोकांना वयाच्या कितव्या वर्षापर्यंत परीक्षा देता येईल, याचेही निकष काही वर्षांपूर्वी अतिशय शिथिल केले गेले. ग्रामीण भागातील मुलांवर अन्याय होऊ नये- मागास समाजातल्या मुलांवर अन्याय होऊ नये, अशा उदात्त हेतूने जरी हे निर्णय घेतले असले तरी याचा एक परिणाम म्हणजे या परीक्षेच्या चक्रात तरुण बरीच वर्ष अडकून पडतात.

यात उमेदीचं वय निघून जातं, नोकरीच्या इतर संधी निसटून जातात आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे अपयशामुळे निराशा येते. अशी तरुणाई कुठचा डेमोग्राफिक डिव्हिडंड देणार देशाला? ओल्ड राजेंद्र नगरमध्ये घडलेल्या दुर्घटनेची मुळं सर्वदूर पसरली आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी अनेक पातळ्यांवर ठोस प्रयत्न होण्याची गरज आहे. ओल्ड राजेंद्र नगरमध्ये कॅंडल मार्च करणाऱ्या, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मला आशा आहे, की यातलेच काही विद्यार्थी भविष्यात प्रामाणिक अधिकारी होतील आणि आपापल्या परीने व्यवस्था ठीक करण्याचे प्रयत्न करतील. काही विद्यार्थी उद्योगधंद्यांकडे वळतील आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत भर घालतील. काही डॉक्टर पुन्हा वैद्यकीय क्षेत्राकडे वळतील आणि रुग्णांची सेवा करतील. अशा तरुणाईला समाज म्हणून आपण किती आधार देतो आणि त्यांच्या कामात सहभागी होतो, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

# बुकमार्क : दैवतांच्या अतर्क्य जगात

पुराणकथांमध्ये उल्लेख असलेल्या देवतांची ख्याती जशी सर्वदूर पोहोचली, तशी रानावनात राहणाऱ्या समाजाच्या दैवतांची माहिती पोहोचली नाही. अशा दैवतांची अधिष्ठाने ही मूलतः नैसर्गिक तत्त्वांना जोडलेली असतात. काही वेळा ती उग्रही भासतात. अशा देवता, त्यांच्या अनुषंगाने रूढ झालेल्या चालीरीती या संदर्भात माहिती देणाऱ्या पुस्तकाविषयी. उजेड! उजेडात सगळ्यांना सगळं दिसतं. पण हा उजेड नसून हे दर्शन आहे. भूत, वर्तमान आणि भविष्याचं कथन सांगणारं कांतारा या सिनेमातलं दैव म्हणजेच पंजुर्ली या दैवताच्या तोंडून आलेला हा मार्गदर्शनपर संवाद कदाचित अनेकांना आठवत असेल. अगदी वेगळ्या धाटणीचा आणि दुर्लक्षित परंतु समृद्ध परंपरांच्या अधिष्ठानावर उभा केलेला हा सिनेमा यातल्या लोककथा, त्यांचे सामाजिक संदर्भ आणि (सहसा माहीत नसलेल्या) दैवतांमुळे प्रचंड गाजला. सिनेमात अभ्यासपूर्वक दाखवलेलं पूजन ज्या भागांत प्रामुख्यानं होतं, तो भाग म्हणजे तुळू भाषकांचा प्रदेश. कर्नाटकातील किनारपट्टीचा भाग, दक्षिण कन्नड, उडुपी आणि केरळमधील कासरगोड या जिल्ह्यांत प्रामुख्यानं तुळू भाषा बोलणारे, वेगवेगळ्या दैवां चं पूजन करणारे लोक इथे आढळतात. के. हरी कुमार यांनी या परंपरेचं केलेलं अध्ययन, या संदभार्तील अभ्यासकाळात आलेला अनुभव दैव या ग्रंथाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यासह लोकपरंपरेच्या मंथनातून निर्माण झालेल्या दैवांबाबतच्या कथा, हा ग्रंथ अधिक रोचक करण्यात यशस्वी ठरल्या आहेत, असं म्हणता येईल.

दैव : डिस्कव्हरिंग द एक्स्ट्राऑर्डिनरी वर्ल्ड ऑफ स्पिरिट वर्शिप हा ग्रंथ एका विशिष्ट प्रांतातल्या, विशिष्ट प्रकारच्या दैवतांबाबत आणि त्यायोगे येणाऱ्या चालीरीतींबाबत माहिती देतो. तुळू भाषक भागांतील आराध्य देवतांचे प्रकार, स्थाने, त्यांचं मूळ आणि प्रत्येकाच्या पूजन पद्धतींत असलेली साम्य स्थळं आणि त्यातील फरक असे घटक नीटपणे मांडलेले आहेत. ग्रंथाच्या पहिल्या भागात तुळू भाषेचं क्षेत्र, चैतन्यपूर्ण आत्म्यांची/उपदेवतांची उत्पत्ती, दैवांच्या आराधनेचा केंद्रबिंदू असलेलं ह्यभूथ कोलाह्ण सारखं नृत्य आणि त्याबाबत असणारी लेखकाची भूमिका स्पष्ट केली आहे. तर दुसऱ्या भागात पंजुर्ली, कोरगज्जा, मंत्रदेवता, गुलिगा/ गुलिकन आणि मातृदेवता अशा विविध दैवांच्या उत्पत्तीच्या आणि त्यांचे विशेष दाखवणाऱ्या लोककथा प्रस्तुत केल्या आहेत. आत्मा, दैव, भूत आराधना अशा अनेक भयकारी वाटणाऱ्या आणि चुकीच्या अर्थानं घेतल्या जाण्याचा संभव असलेल्या संज्ञा




लेखकाने सोप्या भाषेत उलगडून दाखवल्या आहेत. पुराणकथांमध्ये उल्लेख असलेल्या देवतांची ख्याती जशी सर्वदूर पोहोचली, तशी रानावनात राहणाऱ्या दुर्लक्षित समाजाची ही दैवतं, त्यांच्या दंतकथा तितक्याशा पोहोचल्या नाहीत, हे सत्य आहे. समाजाने काळानुरूप आराध्य देवता, दैवते आणि परंपरा यांच्यात बदल केल्याचंही दिसून येतं. कोण कुठल्या स्थानी आणि राजवटीत राहिला यावरही ते अवलंबून होतं याचा अंदाज बांधणं फारसं कठीण नाही. उदा. वेदकाळात इंद्र, वरुण, अग्नी आणि रूद्र या एकेका निसर्गतत्त्वाशी जोडल्या गेलेल्या देवतांचं महत्त्व त्यावेळच्या समाजस्थितीनुसार ठरत गेलं. वेदिक काळात पुजल्या जाणाऱ्या देवतांचं महत्त्व नंतरच्या काळात कमी झाल्याचं आढळून येतं. पुढे गुप्त राजवटीच्या काळात विष्णू ही देवता केंद्रस्थानी आल्याचं पाहायला मिळतं. पण या काळात सीमा भागांत, जंगलात ढकलल्या गेलेल्या जनजातींचीही आपापली दैवतं आणि त्यांचं पूजन करण्याच्या पद्धती होत्या. अशा दैवतांची अधिष्ठाने ही मूलतः नैसर्गिक तत्त्वांना जोडलेली असत. या पूजन पद्धती त्यांच्या जीवनचर्येशी निगडित असण्याचा संभव अधिक असल्यानं त्या उग्र आणि आक्रमक वाटणंही स्वाभाविक आहे. उदा. बौद्ध धमार्ची मूळ परंपरा मध्यवर्ती राज्यात जशी दिसून आली तशी ती पूर्वेकडे प्रसार होताना सीमा भागात दिसत नाही. वज्रयान ही बौद्ध धमार्तील परिवर्तित आवृत्ती हा त्याचाच भाग आहे.

हा ग्रंथ केवळ दैवतांची परंपरा आणि त्यांबाबत माहिती देऊन थांबत नाही. लेखकाचा उद्देश त्याहून अधिक काही असावा हे यातले काही भाग वाचताना स्पष्ट होतं. पाश्चिमात्य सत्ताधीशांनी, ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी आपल्या अहवालात दैवपूजनाच्या उग्र पद्धतींना आक्रमक, आक्रस्ताळं आणि राक्षसी म्हणून नमूद केल्याचं लेखकानं दाखवून दिलं आहे. अर्थात यामागे त्यांचे अनेक पूर्वग्रह आणि दुर्भावनापूर्ण हेतू तर होतेच पण त्याहून अधिक त्यांच्या विचारक्षमतेची मयार्दाही होती. आपल्या लक्षात येतं की दैव, त्यांचं अनोखं पूजन आणि एकंदर जग हे अद्भुताच्या धुक्यात आहे, अस्पष्ट आहे. त्यामुळे लेखक हे स्पष्ट करतो की हा अनेक अर्थांनी खासगी अनुभव आहे. मौखिक स्वरूपात हस्तांतरित झालेलं कथन आहे आणि तकार्चं, वैज्ञानिक दृष्टिकोनाचं हनन करण्याचा विचार या मागे नाही. अशी स्पष्टता आपल्या भूमिकेतून मांडणं गरजेचं यासाठी आहे की अनेक वेळा धर्म, संस्कृती आणि चालीरीतींचा गैरवापर करणारे शोषण, अंधश्रद्धा वाढीस कशी लागेल याची काळजी घेत असतात. त्याची हजारो उदाहरणे आसपास आहेतच. समाजाने अशा शोषणाचा बळी ठरू नये म्हणून तुकोबाराय ठामपणे सांगतात झ्र

नव्हे जाखाई जोखाई। माय राणी मेसाबाई
बळिया माझा पंढरीराव। जो या देवांचाही देव

अर्थात तुकाराम महाराज, एकनाथ महाराज आणि भक्ती परंपरेतील इतर संतांनी या लोकदेवतांना तुच्छ लेखलेले नाही. तशी गल्लत करून घेऊ नये. त्यांनी ओढलेले आसूड हे जसे पुरोहितशाहीसाठी होते तसेच ते अंधश्रद्धा आणि शोषणावर आघात करण्यासाठीही होतेच. म्हणून अगदी सामान्य व्यक्तीला समजेल असा भक्तीचा, नामस्मरणाचा सोपा पण प्रभावी मार्ग त्यांनी आपल्याला दिला.

हा ग्रंथ तसा आटोपशीर असला तरी तो एका विशिष्ट विषयाला धरून आहे. त्याबाबतचे अनेक संदर्भ, कथा आणि नोंदी यात आहेत. त्यामुळे अशा विषयात रुची असणाऱ्या वाचकांना तो अधिक आवडू शकेल. अर्थात लेखकाची भाषा, मांडणी सहज समजणारी आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकारचा वाचक हे वाचू शकेल, पण पहिल्या भागात माहितीचा भडिमार अधिक असल्यानं तिथे लिखाण कंटाळवाणं वाटू लागतं. एक निश्चितच मान्य करायला हवं की अशा प्रकारच्या ग्रंथांमुळे वैविध्यपूर्ण परंपरा, त्यांचं माहीत नसलेलं वेगळेपण आणि लोककथा यांची माहिती आणि महत्त्व वाचकांच्या माध्यमातून समाजाच्या इतर घटकांना ज्ञात होईल. यामुळे महाराष्ट्रातील लोकदेवतांबाबत जाणून घेण्याची जिज्ञासा वाढू शकेल. सुखवस्तू आयुष्य जगणाऱ्या समाज घटकांच्या मनातले अनावश्यक गैरसमज आणि अहंकार या निमित्तानं गळून पडतील आणि स्वीकृती वाढेल. कांतारा सिनेमाच्या शेवटी, पंजुर्ली देवतेसाठी कोला नृत्य करणारा साधक ग्रामस्थांचे हात आपल्या हृदयावर ठेवून एकदिलाने राहण्याचं संकेताने सुचवतो. धर्म, संस्कृती, जातीपातीच्या कोलाहलात तो एकोप्याचा स्वर शोधून, कान देऊन ऐकण्याची गरज आहे हे निश्चित!


## वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी- ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. वविशम /कवि/८५६/२०२४-२०२५
दिनांक :- ०१/०८/२०२४

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येहतेप्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संर्दभाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज -2 | NL02/574/43 | 1921 | अनिल बापु सातजी | विनय सुभाष शेडगे व सुभाष गणपत शेडगे |
| 2 | तुळींज -2 | NL02/455/70 | 1923 | मंजु राजू शर्मा | जिलाजीत भगवानदास जायसवाल |
| 3 | तुळींज -2 | NL02/390/12 | 1925 | शमीम अहमद के अली खान | शिवकुमार इंद्रजीत गुप्ता |
| 4 | तुळींज -2 | NL02/708/136 | 1929 | रविंद्र श्रीरंग चव्हाण | रोहित रविंद्र चव्हाण |
| 5 | तुळींज -2 | NL02/915/15 | 1935 | ............. | सुशील महावीर मौर्या |
| 6 | तुळींज -2 | NL02/627/27 | 1937 | मोहम्मद कामील शेख | अशोक दरोगा शर्मा |
| 7 | तुळींज -2 | NL02/815/5 | 1939 | ऐजाज अली सगीर अली सिद्दीकी | मो. इद्रीस कुर्बान अन्सारी |
| 8 | तुळींज -2 | NL02/289/136 | 1941 | मिलिंद लक्ष्मण आयरे | सुविधा सामाजिक सेवा संस्था |
| 9 | तुळींज -2 | NL02/950/37 | 1947 | प्रवेझुस्सिन अख्तर हुसैन मौजिन | रिजवान मुस्ताक शेख |
| 10 | तुळींज -2 | NL02/433/52 | 1959 | मो. अयुब खान | राजेशकुमार श्रीप्रकाश पटेल |
| 11 | तुळींज -2 | NL02/275/34 | 1961 | अरूण आर. दुबे | महेंद्र वसंत गावकर |
| 12 | तुळींज -2 | NL02/940/129 | 1967 | संगिता डि सिंह | रागिनी देवी अखिलेख कुमार पाण्डेय व अखिलेश कुमार पाण्डेय |
| 13 | तुळींज -2 | NL02/776/37 | 1976 | सत्तार मोकित शेख | विकास रणजीत सिंह |
| 14 | तुळींज -2 | NL02/608/114 | 1986 | सुनिता दऱ्यापा पुकळे | संजना संजय अवेरे |
| 15 | तुळींज -2 | NL02/967/39 | 1998 | नाजमा बेगम मोहम्मद सलीम अन्सारी | महबुब मोहम्मद ईस्लाम इलाही |
| 16 | तुळींज -2 | NL02/248/35 | 2002 | दिनेश गंगा यादव | सुनिल जियालाल कनोजिया |
| 17 | तुळींज -2 | NL02/996/10 | 2004 | अब्दुल मोईज मजीद खान | समीर मोहम्मद आली सैफी |
| 18 | तुळींज -2 | NL02/518/40 | 2008 | चांदनी सुरज जायसवाल व सुरज शिवशंकर जायसवाल | कविता महेंद्र दुबे |
| 19 | तुळींज -2 | NL02/606/38 | 2010 | रजीया बानो | मोहम्मद नसीब अली |
| 20 | तुळींज -2 | NL02/831/5 | 2012 | लक्ष्मी बाळाराम कांगणे | अनिता अशोक बोळावे |

सही /-

प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती (बी) विरार पूर्व
वसई-विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र



मुंबई, मंगळवार, ०६ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०२४

# ‘या’ चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!

**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.



**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

### टॉवेलची स्वच्छता

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

### आता आली फेकून देण्याची वेळ

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

### टर्किश की कॉटन टॉवेल

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

### सूर्यप्रकाश महत्त्वाचा

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



### एकट्याने वापरण्याची गरज

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.


# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**
**मुख्य कार्यालय - विरार**
**दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३**

**जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१०९८/२४-२५**

**दिनांक :- ०१/०८/२०२४**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदभार्ने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-४ | NL२७/६३/२ | ७९४ | मंगल पॅलेस | रंजनकुमार रामचंद्र श्रीवास्तव / रेखा र. श्रीवास्तव |
| २ | निळेमोरे-४ | NL२७/२५/२४ | १२०४ | अशोक जी कुडतकर | अश्विनी अशोक कुडतरकर |
| ३ | निळेमोरे-४ | NL२७/३१/८ | १३१६ | वंदना रामचंद्र एंरांबे | अजय शंभुनाथ गुप्ता व सीता अजय गुप्ता |
| ४ | निळेमोरे-२ | NL२५/८५/३४ | १३०१ | मंगेश किसन आंधळे / सुधीर किसन आंधळे | ऍलिसन फनार्डीस |
| ५ | निळेमोरे-१ | NL२४/२८/९७ | १३२६ | कुलवंत कौर बलविंदर सिंग बिर्दी | इम्रान अस्लम खान व रुबीना इम्रान खान |
| ६ | निळेमोरे-३ | NL२६/३८/२८ | १३२८ | हिरालाल श्रीराम करेलीया | शिवानी सुधाकर देसाई / सुधाकर आत्माराम देसाई |
| ७ | निळेमोरे-१ | NL२४/६९/४९ | १३३५ | दिलीप वसंतभाई पटेल | डॅनी नाझरेथ रॉड्रीग्ज |
| ८ | निळेमोरे-१ | NL२४/२७/६ | १२८१ | भरत गोपाळ पटेल | सदानंद प्रसाद रामजी शाह / मधुदेवी सदानंद प्रसाद |
| ९ | निळेमोरे-४ | NL२७/६४/२ | १२७७ | ज्ञानेश्वर कृष्णा पाटकर / ज्ञानदा | ज्ञानेश्वर पाटकर रविंद्र जयराम सोलकी |
| १० | निळेमोरे-२ | NL२५//२८/४४ | ११९४ | चंद्रकांत वासूदेव केरकर | अनिल कुमार रामयादी गुप्ता व अरुणकुमार रामयादी गुप्ता |
| ११ | निळेमोरे-१ | NL२४/६९/६४ | १३३३ | सिमला कस्ट्रक्शन | स्वप्नील नाझरेथ रॉड्रीग्ज |
| १२ | निळेमोरे-४ | NL२७/९२/१६ | १५३६ | प्रभुनाथ बिटेश्वरनाथ तिवारी | रेखा प्रभुनाथ तिवारी |
| १३ | निळेमोरे-४ | NL२७/१४/२६ | १४५१ | जयप्रकाश विष्णू गुरव | शबनम करीम चुनावाला / करीम जुबेर चुनावाला |
| १४ | निळेमोरे-२ | NL२५/८५/३९ | १४७३ | संदीप चंद्रकात गुरव | आशा शैलेश मेहता व शैलेश हंजारीलाल मेहता |
| १५ | निळेमोरे-१ | NL२४/६६/६८ | १४८५ | श्रीपाल धोंडू तांबे | फैयाज अहमद नियाज अहमद शेख / रेहाना फैयाज शेख |
| १६ | निळेमोरे-३ | NL२६/७/३७ | १५०९ | न्यू गिरनार को.ऑ.हौ.सोसा., | शमीम बाबालाल पेंढारी |
| १७ | निळेमोरे-३ | NL२६/२३/४५ | १६२६ | स्वागत को. ऑ.हौ. सोसा., | पराग मधुकर पंडीत |
| १८ | निळेमोरे-४ | NL२७/१४/६० | १६१६ | मनीष यशवंत पाटेकर / भावना मनीष पाटेकर | किरण केशव जाधव व कोमल किरण जाधव |
| १९ | निळेमोरे-२ | NL२५/४३/१९ | १६२८ | संजय गणेश माणगांवकर | नितेश कुमार सिंह व जुली देवी |
| २० | निळेमोरे-४ | NL२७/१२४/१९ | १६५६ | संतोष ई सावंत | दिपीका दिनेश तळेकर |

**सही/-**
**(निता कोरे)**
**प्र. सहाय्यक आयुक्त**
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**
**वसई विरार शहर महानगरपालिका**


# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# घसादुखीवर ‘हे’ झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्‌भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..

१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल. याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com